**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : संतोष हरीभाऊ कोल्हे,
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : शेती,
राहणार : शिंगवे पारगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके**

१. दि.२२/०३/२०२४ रोजी पारगाव पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी जारकरवाडी बढेकर मळा येथे बोलविले होते. तेथे जाऊन पंचनामा तयार केला व माझी सही घेतली. आता मला दि.२२/०३/२०२४ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी अनुक्रमांक १ वर सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२५** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपासः आरोपीतर्फे वकील श्री. दिपक लोहोटे यांच्यामार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हे माझे मामा आहे. मी आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने मला साक्ष कशी द्यायची हे सांगितले. पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता उपस्थित राहण्यासाठी पत्र दिले नव्हते. मी पंचनामा करण्याकरीता अंदाजे दुपारी २.०० च्या दरम्यान गेलो होतो. पंचनामा करण्याकरीता साधारण अर्धा तास वेळ लागला. मी ज्या जमिनीमध्ये पंचनामा करण्याकरीता गेलो त्या जमिनीचा गट नंबर मला सांगता येणार नाही. मला पंचनामा करण्याअगोदर घटनेबाबत माहिती नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाची परीस्थिती त्यावेळी काय होती हे मला सांगता येणार नाही. घटनास्थळी नारळाची तीन झाडे होती. एक कडीपत्त्याचे झाड व एक निंबोनीचे झाड होते. घटनास्थळी इलेक्ट्रीक पोल आहे. घटनास्थळ पंचनाम्यामध्ये इलेक्ट्रीक पोलचा उल्लेख का नाही याचे कारण

मला सांगता येणार नाही. घटनास्थळाच्या आजुबाजूची परिस्थिती मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हे माझे मामा असल्याने मी त्यांच्या सांगण्यावरुन खोट्या पंचनाम्यावर सही केली व आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा तयार करुन ठेवला होता आणि त्यावर माझ्या फक्त सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. २१/०१/२०२६**
**घोडेगाव**